महाराष्ट्र शासन
दीनदयाळ अंत्योदय योजना- राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान
राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष
नगरपरिषद प्रशासन संचालनालय
७ वा मजला बेलापूर भवन, बेलापूर, नवी मुंबई
Email: nulmmaharashtra@gmail.com

जा. क्र : DAYNULM/SUH/SLSMC/D१०/२०२३-२४/ 3468 .  दिनांक : 23 JUN 2023

प्रति,

१. मा.जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सर्व जिल्हे

२. मा. आयुक्त,
सर्व महानगरपालिका

३. मुख्याधिकारी,
सर्व नगरपरिषदा/नगरपंचायती

विषय : रस्त्यावर व उघड्यावर झोपणाऱ्या बेघर व्यक्तींचे पावसाळ्यामध्ये निष्कासन न करणेबाबत व पावसापासून संरक्षण करणेबाबत..

संदर्भ: १. नगरविकास विभागाचे पत्र क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र. २०८/नवि-२० दि.२९/०६/२०२१

२. महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०००/प्र.क्र.१३९/ज-१ दि.१०/०२/२००१

३. या कार्यालयाचे पत्र क्र. DAY-NULM/SUH/D-१०/२०२२-२३/३१९९ दि. २१/०७/२०२२

दीनदयाळ अंत्योदय योजना- राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत नागरी बेघरांना निवारा घटकाची अंमलबजावणी करण्यात येते. सदर घटकांतर्गत नागरी बेघरांना सर्व सोयी सुविधायुक्त निवा-याची सोय करणे अपेक्षित आहे.

उपरोक्त संदर्भ १ नुसार व संदर्भ २ नुसार पावसाळ्यात अनधिकृत बांधकामावर /झोपडपट्यावर कारवाई केल्याने त्यातील राहणारे रहिवाशी बेघर होतात व अशा बेघर लोकांना नागरी बेघर म्हणून पुन्हा महानगरपालिकेमार्फत/नगरपरिषदेमार्फत पुन्हा नागरी निवारा केंद्रामध्ये समाविष्ट करून घ्यावे लागते व पर्यायाने नागरी बेघर निवारा केंद्राच्या नियोजनावर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे पावसाळ्यात निष्कासनाची कारवाई करू नये. अशा सूचना राज्यस्तरीय नागरी बेघर निवारा संनियंत्रण समितीनेही केल्या आहेत.

राज्यातील सर्व शसकीय, निमशासकीय अथवा खासगी जमिनीवरील अनधिकृत झोपडपट्ट्या किंवा अन्य अनधिकृत बांधकामे दरवर्षी पावसाळ्यात म्हणजेच दि. ०१ जून पासून ते ३० सप्टेंबर पर्यंतच्या कालावधीत पाडण्यात येऊ नयेत अशा सूचना संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये महसूल व वन विभागाने संबंधितांना दिलेल्या आहेत, राज्यस्तरीय निवारा सनियंत्रण समितीने पावसाळ्यात बेघरांचे निष्कासन करण्यात येऊ नये तसेच पावसाळ्यात सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी पावसापासून बेघरांचे संरक्षण करण्याकरिता निवारा उपलब्ध करून द्यावा असे वेळोवेळी सूचित केले आहे. त्या अनुषंगाने उपरोक्त संदर्भ ३ नुसार सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. पावसाळ्यामध्ये पावसापासून बेघरांचे संरक्षण करण्याकरिता नोडल अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत करावी.

१. ज्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये निवारे कार्यरत आहेत, त्या ठिकाणी भेटी देऊन तेथील सोयी सुविधांची पाहणी करण्यात यावी, त्याचप्रमाणे ज्या सोयी सुविधांचा अभाव आहे अशा सोयी सुविधांची तत्काळ पूर्तता करावी.

२. पावसळ्यात बेघारांचे निष्कासन होणार नाही याची दक्षता घ्यावी व निष्कासनाची आवश्यकता भासल्यास त्यापूर्वी त्यांच्या निवा-याची सोय करण्यात यावी.

३. शहरातील एकही बेघर निवा-याविना राहू नये या दृष्टीकोणातून कायमस्वरूपी तसेच तात्पुरत्या निवा-यांचे नियोजन करावे.

४. ज्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवारे कार्यरत नाहीत त्यांनी तत्काळ तात्पुरता निवारा सुरू करावा. त्याचप्रमाणे सदर निवारा सुरू होण्यास वेळ लागत असल्यास शहरातील

बेघरांची व्यवस्था जवळील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमधील कार्यरत निवा-यामध्ये समन्वय साधून तत्काळ करण्यात यावी.

५. पोलिस व स्वंयसेवी संस्था यांच्या मदतीने रात्री रस्त्यावर / उघड्यावर झोपलेल्या व्यक्तींना तत्काळ जवळच्या निवारा केंद्रात हलविण्यात यावे. तसेच त्यांना पावसापासून संरक्षण करण्यासाठीच्या सर्व सुविधा तत्काळ पुरविण्यात याव्यात. याबाबतची पथके आपल्यामार्फत तयार करण्यात यावीत.

६. निवारा पुरविण्यात आलेल्या बेघरांची संख्या अद्यावत ठेवण्यात यावी.

७. निवा-यामध्ये गरम पाणी, ब्लांकेट, चादर, सतरंजी, पलंग याची व्यवस्था करण्यात यावी.

८. पावसाळ्यात उद्भवणाऱ्या आजरापासून संरक्षण करण्यासाठी प्रतीबंधाकात्मक उपाययोजना करण्यात याव्यात.

९. कोणताही बेघर रस्त्यावर / उघड्यावर राहणार नाही तसेच निवा-या अभावी अथवा पावसामुळे कोणताही मृत्यू होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

(किरण कुलकर्णी भा.प्र.से.)
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय